# एआय शिकण्याची सुवर्णसंधी ; चार शहरांत कार्यशाळा

## दैनिक 'पुढारी' आणि अ कन्सल्टन्सीच्या वतीने विशेष कार्यशाळेचे आयोजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भविष्यातील वेगाने बदलणारे जग कृत्रिम बुद्धिमत्तेवर (एआय) आधारित असणार आहे. या नव्या युगात स्वतः ला अपडेट ठेवून यशस्वी वाटचाल करण्यासाठी एक सुवर्णसंधी दै. 'पुढारी' आणि 'अ कन्सल्टन्सी' यांनी उपलब्ध करून दिली आहे. पुणे येथील कार्यशाळांच्या प्रचंड यशानंतर आता कोल्हापूर, सांगली, कराड आणि सातारा येथे बेसिक्स ऑफ ए. आय. अँड ए. आय. टूल्स या एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेत ए.आय. तंत्रज्ञानाची क्लिष्ट माहिती सोप्या आणि सहज समजेल अशा भाषेत दिली जाणार आहे. विद्यार्थी, व्यावसायिक, नोकरदार, गृहिणी, फ्रीलान्सर अशा कोणत्याही वयोगटातील आणि शैक्षणिक पार्श्वभूमीची व्यक्ती यात सहभागी होऊ शकते.

**काय शिकणार कार्यशाळेत?**

विविध एआय टूल्सचा दैनंदिन जीवनात आणि व्यवसायात प्रभावी वापर कसा करावा, यावर भर दिला जाईल. सहभागींना प्रेझेंटेशन, वेबसाईट, व्हिडीओनिर्मिती, सोशल




मीडिया पोस्ट, लोगो डिझाईन आणि कन्टेन्ट रायटिंगसाठी उपयुक्त ठरणाऱ्या २० हून अधिक ए.आय. टूल्सचे प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण मिळेल.

या कार्यशाळेत ए.आय. आणि मार्केटिंग सल्लागार डॉ. अमेय पांगारकर व प्रॉम्प्ट इंजिनिअर प्रसाद कुलकर्णी हे मार्गदर्शन करतील. सोबतच, ए.आय.तज्ज्ञ डॉ. भूषण केळकर भविष्यातील करिअर संधींवर, तर मानसशास्त्रज्ञ डॉ. मधुरा केळकर या तंत्रज्ञानाच्या मानसिक पैलूंवर प्रकाश टाकतील.

ही कार्यशाळा सशुल्क असून त्यासाठी २,५०० इतके शुल्क आकारण्यात येणार आहे. ही

**कार्यशाळेचे वेळापत्रक**

- **कोल्हापूर :** दि. १८ जुलै २०२५, स्थळ : स्वामी विवेकानंद कॉलेज, ताराबाई पार्क
- **सांगली :** दि. १९ जुलै २०२५, स्थळ : गणपतराव आरवाडे कॉलेज ऑफ कॉमर्स, कॉलेज कॉर्नर
- **कराड :** दि. २० जुलै २०२५, स्थळ : लिगाडे पाटील ज्युनिअर कॉलेज, विद्यानगर
- **सातारा :** दि. २१ जुलै २०२५, स्थळ : कला व वाणिज्य महाविद्यालय, शुक्रवार पेठ

कार्यशाळा सकाळी ९.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत होईल. सहभागींना 'ए.आय.च्या बटव्यातून' आणि 'इंडस्ट्री ४.०' ही बेस्टसेलर पुस्तके, दुपारचे जेवण, चहा-नाश्ता आणि सहभागाचे प्रमाणपत्र दिले जाईल. जागा मर्यादित असल्याने इच्छुकांनी आपला प्रवेश लवकरात लवकर निश्चित करावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

**अधिक माहिती व नावनोंदणीसाठी :**

तन्वी आंबेरकर : ७७५८९४५३२४

रोहित जोशी : ९८३४४३३२७४

तरुण भारत संवाद

गुरुवार, १७ जुलै २०२५

# विवेकानंदमध्ये डॉक्टरांचे व्याख्यान संपन्न

**कोल्हापूर :** आपत्कालीन परिस्थितीमध्ये वैद्यकीय क्षेत्राचे महत्त्व जाणून घेण्यासाठी विवेकानंद महाविद्यालयात इंडियन सोसायटी ऑफ क्रिटिकल इलनेस यांच्यामार्फत व्याख्यानाचे आयोजन केले होते. अचानक आणि तात्काळ उद्भवलेल्या आजारावर योग्य प्रथमोपचार केले पाहिजेत. दैनंदिन आणि धक्काबुक्कीच्या जीवनात नैसर्गिक आणि मानवी आपदाना सामोरे जावे लागते. शास्त्रीय पद्धतीने परिस्थिती हाताळली पाहिजे आदी गोष्टींवर प्रकाश टाकला. इंडियन कौन्सिल ऑफ क्रिटिकल इलनेसचे चेअरमन डॉ हिरेगौडर, डॉ. साईप्रसाद, डॉ रणजीत मोहिते यांनी मार्गदर्शन केले. मुकुंद नवले यांनी प्रास्ताविक केले. आभार प्रा. सुदर्शन शिंदे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. जितेंद्र भरमगोंडा यांनी केले. प्रा. एस. पी. पाटील केले. प्रा. नितीन हिटणीकर, प्रा. किशोर गुजर, प्रा. अभिजीत पाटील, संजय दळवी, आदी उपस्थित होते.

17/7/25

17.7.2025